Abbott

# ॲबॉट इंडिया लिमिटेड

सीआयएन : L24239MH1944PLC007330
नोंदणीकृत कार्यालय : ३, कॉर्पोरेट पार्क, सायन-ट्रॉम्बे रोड, मुंबई-४०० ०७१.
टेलि क्र.: ०२२-५०४६ १०००/२०००
ईमेल आयडी : investorrelations.india@abbott.com वेबसाइट : www.abbott.co.in

## पोस्टल बॅलट नोटीस

याद्वारा सदस्यांना कळविण्यात येते की, कंपन्या अधिनियम, २०१३ ("कायदा") च्या कलम १०८ व ११० च्या तरतुदी, कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ ("नियम") च्या नियम २० व २२ आणि कायदा व नियमांच्या अन्य लागू तरतुदी, निगम कामकाज मंत्रालयाद्वारा निर्गमित केलेले जनरल सर्क्युलर नं. १४/२०२० दिनांकित ०८ एप्रिल २०२०, १७/२०२० दिनांकित १३, २०२० व ०९/२०२३ दिनांकित २५ सप्टेंबर २०२३ दी मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स ("एमसीए सर्क्युलर्स"), सिक्युरिटिज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५च्या रेग्युलेशन ४४, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरिज ऑफ इंडियाद्वारा निर्गमित केलेले सेक्रेटरियल स्टँडर्ड ऑन जनरल मिटिंग्ज आणि अन्य लागू कायदे, नियम व विनियम (समाविष्ट कोणतेही सांविधिक फेरबदल किंवा त्याकरिता वेळोवेळी अंमलात आणलेले पुनर्अधिनियम) च्या अनुसार "ॲबॉट इंडिया लिमिटेड"च्या ("कंपनी") सदस्यांची मान्यता रिमोट ई-वोटिंग प्रक्रियेद्वारा पोस्टल बॅलटमार्फत खालील सामान्य ठरावाकरिता मागविण्यात आली आहे.

| अ.क्र. | सामान्य ठरावांचे वर्णन |
|---|---|
| १. | कंपनीचे संचालक म्हणून श्रीमती स्वाती दलाल यांची नेमणूक (डीआयएन : ०१५१३७५१) |
| २. | कंपनीचे व्यवस्थापन संचालक म्हणून श्रीमती स्वाती दलाल यांची नेमणूक (डीआयएन : ०१५१३७५१) |

"एमसीए सर्क्युलर्स"च्या अनुसार, रिमोट ई-वोटिंगसंबंधित सविस्तर सूचना व स्पष्टिकरणात्मक विवरणासह पोस्टल बॅलट नोटीसच्या इलेक्ट्रॉनिक प्रती अशा सदस्यांना, ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी / रजिस्ट्रार अँड शेअर ट्रान्सफर एजन्ट ("आरटीए") / डिपॉझिटरिज / डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणीकृत आहेत आणि ज्यांची नावे **शुक्रवार, २२ मार्च, २०२४ ("कट-ऑफ तारीख")** रोजी प्रमाणे सदस्य / लाभाधिकारी मालकांच्या नोंदवहीत आलेली आहेत, इलेक्ट्रॉनिक प्रणालीत मंगळवार, २६ मार्च, २०२४ रोजी पाठविण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

उक्त नोटीस www.abbott.co.in या कंपनीच्या वेबसाइटवर आणि www.bseindia.com या बीएसई लिमिटेडच्या वेबसाइटवर तसेच https://evoting.kfintech.com या केफिन टेक्नोलॉजीस प्रायव्हेट लिमिटेडच्या ("केफिनटेक") वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध आहे.

"एमसीए सर्क्युलर्स"च्या अनुषंगाने सदस्य केवळ रिमोट ई-वोटिंग प्रक्रियेद्वारा मतदान करू शकतील. सदस्यांच्या मतदानाच्या हक्कांची कट-ऑफ तारखेनुसार त्यांच्याकडे असलेल्या कंपनीच्या समन्याय भागांच्या आधारे परिगणना करण्यात येणार आहे. सदस्याद्वारा एकदा का ठरावावर मतदान केले गेल्यास, तो / ती तदनंतर ते बदलण्यास सक्षम असणार नाही. कोणतीही व्यक्ती, जी कट-ऑफ तारखेनुसार कंपनीची सदस्य नाही तिने ही नोटीस केवळ माहितीप्रीत्यर्थ समजावी.

कंपनीने तिच्या सदस्यांना रिमोट ई-वोटिंग सुविधेची तरतूद करून देण्याच्या प्रयोजनार्थ तिचे आरटीए, "केफिनटेक"ची सेवा नियुक्त केली आहे. रिमोट ई-वोटिंग **बुधवार, २७ मार्च २०२४ रोजी स. ०९:०० वा. (भाप्रवे) सुरू होईल व गुरुवार, २५ एप्रिल २०२४ रोजी सायं. ०५:०० वा. (भाप्रवे) संपेल.** रिमोट ई-वोटिंग सुविधा गुरुवार, २५ एप्रिल २०२४ रोजी सायं. ०५:०० वा. (भाप्रवे) नंतर "केफिनटेक"द्वरा निःसमर्थ करण्यात येणार आहे.

मंडळाने श्री. तैझून एम. खुम्री, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी (सीपी नं. ८८ व सदस्यत्व क्र. एफसीएस ९९३) यांची स्वच्छ व पारदर्शक पद्धतीत रिमोट ई-वोटिंग प्रक्रियेद्वारा पोस्टल बॅलटच्या आयोजनाकरिता "परिनिरीक्षक" म्हणून नियुक्ती केली आहे.

ठराव, जर आवश्यक बहुमताने मंजूर झाल्यास, रिमोट ई-वोटिंगच्या शेवटच्या तारखे दिवशी म्हणजेच **गुरुवार, २५ एप्रिल २०२४ रोजी** मंजूर झाल्याचे समजण्यात यावे. परिनिरीक्षकाच्या अहवालासमवेत पोस्टल बॅलटद्वारा मतदानाचे निकाल **उशिरात उशिरा शनिवार, २७ एप्रिल, २०२४ रोजी सायं. ०५:०० वा. पर्यंत** घोषित करण्यात येणार आहेत. सदर निकाल कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात, www.abbott.co.in या कंपनीच्या वेबसाइटवर, https://evoting.kfintech.com या "केफिनटेक"च्या रिमोट ई-वोटिंग वेबसाइटवर प्रस्तुत करण्यात येणार आहेत तसेच बीएसई लिमिटेड, स्टॉक एक्स्चेंजकडेसुद्धा, जेथे कंपनीचे भाग सूचीबद्ध आहेत, संप्रेषित करण्यात येणार आहेत.

ज्या सदस्यांनी त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर ई-मेल पत्त्यांची (i) डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे जेथे त्यांचे डिमॅट अकाउंट्स आहेत, जर भाग इलेक्ट्रॉनिक स्वरूपात आहेत, आणि (ii) ज्या सदस्यांकडे प्रत्यक्ष स्वरूपात भाग आहेत, ज्यांनी त्यांचे ई-मेल पत्ते कंपनीकडे नोंदणीकृत केलेले नाहीत / अपडेट ठेवलेले नाहीत, त्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी "केफिनटेक", सेलेनियम टॉवर "बी", प्लॉट नं. ३१ व ३२, गाचिबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैद्राबाद-५०० ०३२ येथे आवश्यक पुष्ट्यर्थ कागदपत्रांसमवेत यथोचितरीत्या स्वाक्षरीकृत व भरून फॉर्म आयएसआर-१ सादर करून (https://www.abbott.co.in/investor-relations/investor-centre/investor-download-centre.html यावर उपलब्ध असलेले) नोंदणी करावी / अपडेट ठेवावेत.

कोणतीही शंका / आस्था / तक्रारी याबाबत, सदस्य https://evoting.kfintech.com कडील "केफिनटेक"डाउनलोड्स सेक्शनवर उपलब्ध असलेले रिमोट ई-वोटिंग युजर मॅन्युअल किंवा हेल्प अँड फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स (एफएक्यू'ज) पाहावे किंवा संपर्क साधावा : श्री. प्रेमकुमार नायर, व्यवस्थापक - कॉर्पोरेट रजिस्ट्री, केफिन टेक्नोलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड, सेलेनियम टॉवर "बी", प्लॉट नं. ३१ व ३२, गाचिबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैद्राबाद-५०० ०३२, भारत, ई-मेल : einward.ris@kfintech.com; टोल फ्रि नं. : १८०० ३०९ ४००१ किंवा investorrelations.india@abbott.com यावरून कंपनी सचिवास लेखी विनंती पाठवू शकतील.

**ॲबॉट इंडिया लिमिटेड**

**संगीता शेट्टी**
कंपनी सचिव
सदस्यत्व क्र. : एसीएस १८८६५

**स्थळ :** मुंबई
**दिनांक :** २७ मार्च, २०२४